# हनुमान जयंती

**मनोजम् मारूत तुल्य वेगम**

**जितेंद्रियम बुद्धिमतां वरिष्ठंम्**

**वातात्मजं वानर युथ मुख्यम्**

**श्रीराम दुतं शरण प्रपधे**

या श्लोकात हनुमानाची सर्व विशेषता दर्शविली आहे. याच श्लोकाने आपण त्यास वंदन करीत असतो. त्याच्या जन्माची कथा फारच आगळी वेगळी आहे. ती अशी - राजा दशरथाला पुत्र संतान नव्हते, म्हणून त्यांनी पुत्र कामेष्टी यज्ञ केला. अग्नी देवता प्रसन्न होऊन त्यांनी यज्ञाचा फल-स्वरूप-प्रसाद राजा दशरथाला दिला. राजा दशरथाला कौशल्या, कैकयी व सुमित्रा अशा तीन राण्या होत्या. राजाने तो प्रसाद आपल्या तिन्ही राण्यांना समानतेने वाटून दिला. आपल्या वाटेला तिसरा हिस्सा आला म्हणून नाराज झालेल्या कैकयीने तो प्रसाद बाजूला ठेवून दिला. आकाशातील घारीने प्रसादाचा द्रोण उचलून नेला. कौशल्या व सुमित्रा या दोघी समजदार होत्या. त्यांनी प्रसादाचा अर्धा-अर्धा भाग कैककीला दिला. त्या प्रसादाचे फल स्वरूप कौशलेला राम, कैकयीला भरत व शत्रुघ्न व सुमित्रेला लक्ष्मण अशी पुत्र प्राप्ती झाली.

किष्किंदा नगरीत वानराचं राज्य होते. तेथे केसरी व अंजली नावाचे वानर होते. त्यांना ही संतती नव्हती. म्हणून पुत्र प्राप्तीसाठी अंजनीने ऋषभक पर्वतावर तपश्चर्या सुरू केली होती. आकाशातील घारीच्या तोंडातील प्रसादाचा द्रोण नेमका अंजनीच्या ओंजळीत पडला. तो प्रसाद भक्षण केल्यामुळे अंजनीला पुत्र प्राप्ती झाली. तोच हा हनुमान होय. हर्षेतून प्रसाद पडल्यामुळे अंजनीने आपल्या पुत्राचे नाव हनुमान असे ठेवले. त्यास अंजनीसूत किंवा वायुपुत्र असेही म्हणतात. वायु (पवन) अत्यंत चंचल म्हणजे एका ठिकाणी कधी स्थिर नसतोच तेच पित्याचे गुण पुत्रामध्ये दिसून येतात. कपि म्हणजे वानर, चंचल बुद्धीचे असते; म्हणून त्यास कपि असेही म्हणतात.

हनुमान सूर्योदयात जन्माला आला. तसेच त्याची दिव्य बुद्धी, तेजस्वी शरीर, उत्साह, आनंद, धैर्य, शौर्य, सद्‌गुण इत्यादी सूर्याप्रमाणेच दिसून येतात. त्या वेळी लालसर सूर्य प्रतिबिंध क्षितिजावर दिसून येत होते. जन्मताच हनुमाने त्यास पिकलेले रसरशीत पिकलेले सुंदर फळ समजून त्यावर झेप घेतली व त्यास खाण्यासाठी तोंडात पकडले. मारूती सूर्यास सोडिना व सूर्य काही त्याच्या तोंडात मावेना. सूर्याने सुटण्यासाठी बराच प्रयत्न केला परंतु तो सुटू शकला नाही. तेव्हा इंद्रास असे वाटले की मारूतीने सूर्यास गिळून टाकले तर सर्वत्र अंधःकार होईल म्हणून त्याने आपले वज्रास्त्र मारूतीच्या तोंडावर मारले त्यामुळे मारूती मूर्छित होऊन सूर्याची सुटका झाली व मारूतीचे तोंड चक्रासारखे झाले. इंद्राने मारूतीच्या तोंडावर अमृत सिंचन करून त्यास जागृत केले.

या कथेचा अर्थबोध असा आहे की, या सृष्टीवर काही ठिकाणी वानरांचे अर्थात अविकसित मानवाचे राज्य होते. या राज्यात सर्वत्र पाच विकारांचे राज्य होते. दैवी गुणांची जागा असुरी गुणांनी घेतली होती. या परिस्थितीत परिवर्तन आणावयाचे असेल तर जीवनातील सर्वोत्तम लक्ष्य प्राप्त करण्यासाठी सूर्यवंशी सर्वगुण संपन्न, १६ कला संपन्न बनन्यासाठी ‘सूर्यरूपलक्ष्य ठेवायलाच हवे. परंतु हे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी अनेक संकटे येतील परंतु निवारण्याची शक्ती ही तेवढीच असेल. हनुमान चालीसामध्ये याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. थोडक्यात असे की,

बाल समयी रवी भक्षी लियो - तीन हूं लोक भयो अंधियारा ।

ताही सो त्रास भयो जग को यह संकट काहूं सो जातन हारो ।।

देवन आजि करी बिनती तब छाँई दियो रवि कष्ट निवारो ।

की नहीं जानत है जग में कपि संकट मोचन नाम तिहारो ।।

या श्लोकाचा अर्थ असा आहे की, अतिश्रेष्ठ बुद्धिवान, वायुपुत्र हनुमान, वानर दलाचा मुख्य, श्रीरामाचा दूत, स्वामिनिष्ठ, आज्ञाकारी, ब्रह्मचारी संपूर्ण पवित्र हनुमानाला आपण शरण जातो. वंदन करतो, तसेच तो अनुमान व अभिमानाचे हनन करणाऱ्यांचा प्रतीक आहे. शक्ती देवता म्हणून आपण त्याची मनोभावे पूजा - भक्ती करतो. रामायणातील हनुमान हे आदर्श भक्त, स्वामिनिष्ठ व आज्ञाकारी यांचे सर्वोत्तम, आध्यात्मिकतेचे एकमेव प्रतिक आहे. ज्यात राम आहे मग तो दगड का असेना तो तरू शकतो हे सेतू बांधताना हनुमानाने सिद्ध करून दाखविले आहे.

श्रीरामाशी एकरूप झालेल्या हनुमानाच्या जीवनातील एक प्रसंग असा आहे की श्रीराम रावणाचा वध करून अयोध्येला परत आले. श्रीलंकेवर मिळालेल्या विजयामध्ये वानरांचे मोठे योगदान मिळाले होते, म्हणून त्यांचा गौरव करण्यासाठी श्रीरामाने दरबार भरविला. स्वहस्ते त्यांना निरनिराळे बक्षिसे देऊन त्यांच्या पराक्रमाचे कौतुक केले. अंगदाला स्वतः धारण केलेली आभुषणेदेखील देऊन टाकली. पण हनुमानाला काहीही दिले नाही एवढेच नाहीतर त्याचे नावदेखील बक्षिसाच्या यादीत नव्हते. म्हणून तो नाराज झाला. सीतामाईलादेखील खूप वाईट वाटले. त्या रामाला म्हणाल्या, स्वामी विजयात हनुमानाचा सिंहाचा वाटा असतानादेखील आपण त्यास काहीही दिले नाही. तेव्हा श्रीराम म्हणाले, त्याला बक्षीस देण्यायोग्य मजजवळ काहीही नाही. माझा प्राण दिला तरी ते कमी पडेल. तेव्हा सीतामाईने स्वतःच्या गळ्यातील नवरत्नांचा हार हनुमानाला दिला. त्याने तो आनंदाने स्वीकारला व तो झाडावर जाऊन बसला. एकेक मणी निरखून बघितला. त्यात त्याला काहीही दिसून आले नाही मग त्याने एकेक मणी दाताने फोडून बघितला. अशा रितीने सर्व मणी फोडून फेकून दिले. सीतेने हे बघितल्यावर तिला राग आला. तिने हनुमानाला विचारले एवढा किमती हाराचे तू हे काय केले? तेव्हा हनुमान म्हणाला, 'ज्यात राम नाही ते माझ्या काहीही कामाचे नाही. तेव्हा सीता उद्गारली रत्नामध्ये राम असतो का ? झाडात, दगडा-धोंड्यात राम असतो का? तुझ्यात तरी राम आहे का? तेव्हा मारूतीने तात्काळ आपले हृदय विदीर्ण करून दाखविले. सीतेने त्यात राम पाहिला तेव्हा तिला हनुमानाची रामभक्तीची कल्पना आली.

या प्रसंगावरून हेच लक्षात येते की, ज्याच्या हृदयात ईश्वराचे स्थान आहे तीच व्यक्ती ईश्वराच्या स्मरणात राहते. ईश्वर सेवा - भक्ती करणे हेच आपले लक्ष्य असायला हवे. नवरत्नाचा हार म्हणजे लोभ - माया यांचे प्रतीक आहे. मानवाला आपले लक्ष्य 'देवी-देवता' बनण्याचे प्राप्त करावयाचे आहे. त्यासाठी आपले मन मायाजाळात अटकता कामा नये - ईश्वर कशात नाही पण त्यास आपल्या हृदयात स्थान देणे आवश्यक आहे. हनुमानाचे संपूर्ण जीवन मानव मात्रासाठी एक अत्युच्य आदर्श आहे. 'हनुमान चालीसा', 'भीमरूपीस्तोत्र' इत्यादीमध्ये हनुमान अर्थात मारूतीच्या जीवनाचे, कर्माचे, कर्तव्याचे, आदर्शाचे अनेक स्त्रोत आपणास प्राप्त होऊ शकतात. त्यांच्यातील आध्यात्मिक रहस्य काय आहेत? याचा शोध व बोध घेण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. शब्दार्थ बोध घेण्याने काहीही लाभ होत नाही.

हनुमानाच्या जीवनातील दैवी गुणांच्या विविध पैलूंचा सखोल अभ्यास केल्यास आपणास पवित्रता, स्वामिनिष्ठा, शक्तिसंचय, मर्यादा, आज्ञाधारकपणा, बुद्धीमत्ता, निश्चयात्मक बुद्धी इत्यादी गुण स्पष्टपणे दिसून येतात ते धारण करणे हीच खरी हनुमान भक्ती होय. यावेळी आपण जीवनाला नवे लक्ष्य देऊन हनुमान जयंती साजरी करूया ! जीवन दैवीगुणांनी समृद्ध व सुंदर बनवू या !

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com